# पाच उमेदवारांची नावे राज्यपाल कार्यालयास सादर

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठ कुलगुरू पदासाठीच्या २५ पात्र उमदेवारांच्या मुलाखतींची प्रक्रिया पूर्ण झाली आहे. कुलगुरू शोध समितीकडून घेण्यात आलेल्या ऑनलाईन मुलाखतीमधून पात्र पाच उमेदवारांची नावे राज्यपाल कार्यालयाकडे सादर करण्यात आल्याची माहिती अधिकृत सूत्रांनी दिली.

कुलगुरूपदाच्या निवडीची प्रक्रिया सध्या सुरू आहे. कुलपती कार्यालयाकडून कुलगुरू निवड प्रक्रियेंतर्गत त्रिसदस्यीय शोध समिती नेमण्यात आली. इच्छुक उमेदवारांकडून ऑनलाईन पद्धतीने १६९ अर्ज प्राप्त झाले. शोध समितीकडून पात्र २५ उमेदवारांच्या मुलाखती घेण्यात आल्या. कुलपती कार्यालयास कुलगुरू शोध समितीचे शासन प्रतिनिधी मिलिंद म्हैसकर यांनी पात्र उमेदवारांची नावे दिली आहेत. येत्या काही दिवसांत राज्यपाल पात्र उमेदवारांच्या स्वतंत्र मुलाखती घेतील. त्यानंतर राज्यपाल यांच्याकडून त्यामधील एकाची कुलगुरूपदी निवड केली जाईल. कुलगुरूपदाची कोणाची वर्णी लागते, याकडे विद्यापीठासह शिक्षण वर्तुळाचे लक्ष लागले आहे.

## कुलगुरू निवड



शिवाजी विद्यापीठातून...